# वाक्यपरिवर्तनम।

## अ. प्रयोगा:।

- 'प्रयोग' हे कोणत्याही भाषेचे आवश्यक घटक आहेत.
- वाक्यांचा प्रत्यक्षात वापर करणे म्हणजे 'प्रयोग' होय.
- कर्ता, कर्म आणि क्रियापद यांना दिलेल्या महत्त्वानुसार संस्कृतमध्ये प्रयोगांचे वेगवेगळे प्रकार पडलेले आपल्याला पाहावयास मिळतात.
- प्रत्येक वाक्यात कमीत कमी तीन घटक असतात, ते खालीलप्रमाणे -

अ. **कर्ता:**

- क्रिया करणारा 'कर्ता' म्हणून ओळखला जातो.
- राम: पठति। (राम पुस्तक वाचतो.) येथे वाचनाची क्रिया करणारा राम आहे म्हणून 'राम' हा 'कर्ता' आहे.
- आपण क्रियापदाला 'कोण' असा प्रश्न विचारल्यावर जे उत्तर मिळते, तो 'कर्ता' होय.

ब. **कर्म:**

- क्रिया करणारा 'कर्ता' म्हणून ओळखला जातो.
- कर्ता कर्माच्या साहाय्याने क्रिया करतो.
- जेव्हा क्रिया घडते, तेव्हा कर्माबाबत काही व्यवहार, प्रक्रिया, परिणाम अथवा परिवर्तन घडत असते.
  उदा. राम: पुस्तकं पठति। (राम पुस्तक वाचतो.)
- वाचनाची क्रिया पुस्तकावर घडत आहे.
- पूर्वी रामने एकही पान वाचले नव्हते; परंतु आता काही पाने वाचली आहेत. म्हणजेच पुस्तकावर वाचनाची क्रिया झाली आहे.
- म्हणून 'पुस्तक' हे कर्म होय.

क. **क्रियापदम्:**

- क्रियापदाला नेहमी पुरुष आणि वचन असते.
- क्रियापदाला काळ किंवा अर्थही असतो.
- क्रियापद आपल्याला खालील गोष्टी सांगते.
  १. काल: / अर्थ:     २. पुरुष:     ३. वचनम्
- क्रियापदाला विभक्ती नसते.

**कर्ता-तालिका**

| | एकवचनम् | द्विवचनम् | बहुवचनम् | |
|---|---|---|---|---|
| त्रिषु लिङ्गेषु समानम् | **अहम्** (मी) | **आवाम्** (आम्ही दोघे) | **वयम्** (आम्ही सर्व) | प्रथम-पुरुष: |
| त्रिषु लिङ्गेषु समानम् | **त्वम्** (तू) | **युवाम्** (तुम्ही दोघे) | **यूयम्** (तुम्ही सर्व) | द्वितीय-पुरुष: |
| पुंलिङ्गम् | **स:** (तो) | **तौ** (ते दोघे मुलगे) | **ते** (ते सर्व मुलगे) | तृतीय-पुरुष: |
| स्त्रीलिङ्गम् | **सा** (ती) | **ते** (त्या दोघी) | **ता:** (त्या सर्व मुली) | |
| नपुंसकलिङ्गम् | **तत्** (ते) | **ते** (ती दोन बालके) | **तानि** (ती सर्व बालके) | |


**कर्तरि-प्रयोगात हे सर्व कर्ते नेहमी प्रथमा विभक्तीत असतात.**

- **प्रत्येक शब्दाला पुरुष व विभक्ती असते.**


उदा.

| | | |
|---|---|---|
| रामेण | तृतीय-पुरुषः | तृतीया विभक्तिः |
| वृक्षः | तृतीय-पुरुषः | प्रथमा विभक्तिः |
| लता | तृतीय-पुरुषः | प्रथमा विभक्तिः |
| आवाम् | प्रथम-पुरुषः | प्रथमा विभक्तिः |
| त्वम् | द्वितीय-पुरुषः | प्रथमा विभक्तिः |
| हस्तेन | तृतीय-पुरुषः | तृतीया विभक्तिः |

- **कर्ता, कर्म, क्रियापद यांवर आधारित प्रयोगाचे खालीलप्रमाणे प्रकार होतात.**




वाक्यात खालीलप्रमाणे बदल होतात.




## अ. कर्मक-कर्तरि

* **कर्ता**

| कर्ता | कर्म | क्रियापदम् |
|---|---|---|
| प्रथमा | द्वितीया | कर्त्याप्रमाणे जो प्रथमा विभक्तीत आहे. |
| १ | २ | १ |

१. रामः ग्रन्थं पठति। = सकर्मक-कर्तरि-प्रयोगः

१ २ १

२. अहं चित्रं पश्यामि। = सकर्मक-कर्तरि-प्रयोगः

१ २ १

## ब. कर्मणि-प्रयोगः

* **कर्म**

**कर्मणि-क्रियापदम्**

| | | | |
|---|---|---|---|
| **कर्मणि-क्रियापदम् = मूलधातुः +** | **य** | + | **आत्मनेपद-प्रत्ययः** |

१. गम् → गच्छ् (१. प.प.)

कर्मणी क्रियापद = गम् + य + ते (उदाहरणासाठी वर्तमानकाळ तृतीय पुरुष एकवचन)

= गम्यते

कर्मणि-प्रयोगः

| कर्ता | कर्म | क्रियापदम् |
|---|---|---|
| तृतीया | प्रथमा | कर्माप्रमाणे जे प्रथमा विभक्तीत आहे. |
| ३ | १ | १ |

रामेण **ग्रन्थः पठ्यते।**

३ १ १

रामेण **ग्रन्थौ पठ्येते।**

३ १ १

रामेण **ग्रन्थाः पठ्यन्ते।**

३ १ १

*** कर्मणि क्रियापदे सर्व काळांत व अर्थांमध्ये रचली जाऊ शकतात.**

| | | **वर्तमानकालः** | **प्रथम-भूतकालः** | **आज्ञार्थः** | **विध्यर्थः** |
|---|---|---|---|---|---|
| १. | पठ् (१ प.प.) | पठ्यते | अपठ्यत | पठ्यताम् | पठ्येत |
| २. | पूज् (१० उ.प.) | पूज्यते | अपूज्यत | पूज्यताम् | पूज्येत |
| ३. | नृत् (४ प.प.) | नृत्यते | अनृत्यत | नृत्यताम् | नृत्येत |
| ४. | मुच्-मुञ्च् (६ उ.प.) | मुच्यते | अमुच्यत | मुच्यताम् | मुच्येत |
| ५. | पा-पिब् (१ प.प.) | पीयते | अपीयत | पीयताम् | पीयेत |

## क. अकर्मक-कर्तरि-प्रयोगः

पर्णं पतति । (पान पडते.)

कर्ता – पर्णम् (प्रथमा-विभक्तिः)

क्रियापदम् – पतति (कर्त्याच्या पुरुष आणि वचनाप्रमाणे)

येथे पडण्याची क्रिया घडत आहे.

कर्ता स्वतः या क्रियेत पूर्णपणे गुंतलेला आहे.

∴ क्रिया कर्त्यावरच घडत आहे.

अन्य कोणतेही कर्म असण्याची येथे आवश्यकता नाही.

कर्ता स्वतःच येथे कर्म आहे.

या प्रकारच्या प्रयोगास अकर्मक-कर्तरि-प्रयोग म्हणतात.

| कर्ता | कर्म | क्रियापदम् |
|---|---|---|
| प्रथमा | – | कर्त्याप्रमाणे जो प्रथमा विभक्तीत आहे. |
| १ | ० | १ |

## ड. भावे-प्रयोगः

येथे क्रिया महत्त्वाची असते.
म्हणून क्रियापद कर्ता किंवा कर्म यांप्रमाणे चालत नाही.
भावे प्रयोगात ते नेहमी तृतीयपुरुषी एकवचनी असते.

| कर्ता | कर्म | क्रियापदम् |
|---|---|---|
| तृतीया | – | तृतीयपुरुषः एकवचनम् |
| ३ | ० | १ |

उदा.

पर्णेन पत्यते।
सीतया स्थीयते।
रामेण हस्यते।
सिंहेन म्रियते।

भावे प्रयोगात केवळ अकर्मक धातूच असतात.
भावे क्रियापदाचे रूप खालीलप्रमाणे होते.

**भावे-क्रियापदम्**

**भावे-क्रियापदम् = मूलधातुः + य + आत्मनेपद-प्रत्ययः (तृतीयपुरुषः एकवचनम्)**

उदा.

भू-भव् (१ प. प.) – भूयते।
स्था-तिष्ठ् (१ प. प.) – स्थीयते।
वृध्-वर्ध् (१ अ. प.) – वृध्यते।
जीव् (१ प. प.) – जीव्यते।
क्रीड् (१ प. प.) – क्रीड्यते।

**खालील तक्त्यात सकर्मक व अकर्मक धातूंची कर्मणि-भू-धा-वि आणि कर्तरि-भू-धा-वि यांचे विवरण दिले आहे.**

| | **कर्मणि-भू-धा-वि** | **कर्तरि-भू-धा-वि** |
|---|---|---|
| **सकर्मक धातू** | मूळ धातू + **त** | मूळ धातू + **तवत्** |
| **अकर्मक धातू** | ×××××<br>(बदलत नाही) | मूळ धातू + **त** किंवा<br>मूळ धातू + **तवत्** |

| | **कर्मणि-भू-धा-वि** | **कर्तरि-भू-धा-वि** |
|---|---|---|
| **सकर्मक धातू**<br>**पठ् (१ प. प.)** | पठ् + त = पठित | पठ् + तवत् = पठितवत् |
| **अकर्मक धातू**<br>**स्था (१ प. प.)** | (बदलत नाही)<br>××××× | स्था + त = स्थित किंवा<br>स्था + तवत् = स्थितवत् |

| | **कर्मणि-भू-धा-वि** | **कर्तरि-भू-धा-वि** |
|---|---|---|
| **सकर्मक** | रामेण ग्रन्थः पठितः। | रामः ग्रन्थं पठितवान्। |
| **अकर्मक** | ××××<br>(बदलत नाही) | रामः स्थितः। किंवा<br>रामः स्थितवान्। |

## ब. सति-सप्तमी।

### सति-सप्तमीरचनां निष्कासयत।

सति-सप्तमीरचना असलेले वाक्य गुंतागुंतीचे वाक्य असते. आपण सति-सप्तमीची रचना काढताना या वाक्याचे आपण संयुक्त वाक्यात रूपांतर करतो. संयुक्त वाक्यात दोन केवल वाक्ये असतात जी अव्ययांच्या जोडीने जोडली जातात.

ती खालीलप्रमाणे करता येतील –

अ. वाक्याचे दोन भाग ओळखावेत - मुख्य वाक्यांश आणि गौण वाक्यांश.

ब. गौण वाक्यांशातील सप्तमी विभक्तीतील पदे प्रथमा विभक्तीत बदलावीत.

क. वाक्याच्या आशयाप्रमाणे योग्य अव्ययांची जोडी निवडावी आणि गौण वाक्यांश त्या दोन अव्ययांमध्ये बसवावा.
यदा-तदा (जेव्हा-तेव्हा), यावत्-तावत् (जोपर्यंत-तोपर्यंत) यद्यपि-तथापि (जरी-तरी देखील), यदि-तर्हि (जर-तर)

ड. काहीवेळा प्रथमा विभक्तीतील धातुसाधित विशेषणांऐवजी क्रियापदांचाही वापर करतात. तसेच अस् किंवा भू धातूंच्या रूपांचाही संदर्भानुसार जेथे आवश्यकता असेल तेथे उपयोग करतात. असे करताना मात्र मुख्य वाक्यांशाचा जो काळ किंवा अर्थ असेल तोच गौण वाक्यांशाचाही राहील याची काळजी घ्यावी.

इ. जेव्हा गौण वाक्यांशात भूतकालवाचक धातुसाधित विशेषण वापरलेले असते; तेव्हा गौण वाक्यांश क्रिया घडलेली आहे, असा त्याचा अर्थ होतो.

फ. जेव्हा गौण वाक्यांशात वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषण वापरलेले असते, तेव्हा गौण क्रिया घडत असताना मुख्य क्रिया घडत आहे असे समजावे.

ग. सति-सप्तमीरचनेत बहुतकरून धातुसाधित विशेषण हे कर्त्यापूर्वी योजतात.

(उदा. समासे युद्धे......, प्राप्तायां निशायां......, दत्ते अन्ने......,) सति-सप्तमीची रचना काढताना आवश्यकतेनुसार शब्दांची फेरमांडणी करावी.

## *स्वाध्याय:

**सति-सप्तमीरचनां निष्कासयत।**

१. **प्राप्तायां निशायां स निद्राधीनः जातः।**
**यदा निशा प्राप्ता तदा** स निद्राधीनः जातः।

२. **छिन्ने मूले** नैव पत्रं न शाखा।
**यदि मूलं छिन्नं तर्हि** नैव पत्रं न शाखा।

३. **दुःखिते मनसि** सर्वमसहायम्।
**यदि मनः दुःखितं तर्हि** सर्वमसहायम्।

४. **दैवे** दुर्बलतां **गते** तृणमपि प्रायेण वज्रायते।
**यदा दैवं** दुर्बलतां **गतम् अस्ति तदा** तृणमपि प्रायेण वज्रायते।

५. **विक्रीते करिणि** किम् अङ्कुशे विवादः।
**यदि करी विक्रीतः तर्हि** किम् अङ्कुशे विवादः।

६. **उत्तीर्णे च परे पारे** नौकायाः किं प्रयोजनम्।
**यदि परः पारः उत्तीर्णः तर्हि** नौकायाः किं प्रयोजनम्।

७. **उदिते तु सहस्रांशौ न** खद्योतः न चन्द्रमाः।
**यदा सहस्रांशुः उदितः तदा** न खद्योतः न चन्द्रमाः।

८. **उदिते परमानन्दे** न त्वं नाहं न वै जगत्।
**यदा परमानन्दः उदितः तदा** न त्वं नाहं न वै जगत्।

९. **अप्रतिबुद्धे श्रोतरि** वक्तुः वाक्यं प्रयाति वैफल्यम्।
**यदि श्रोता अप्रतिबुद्धः तर्हि** वक्तुः वाक्यं प्रयाति वैफल्यम्।

१०. **दैवे** विमुखतां **याते** न कोऽप्यस्ति सहायवान्।
**यदा दैवं** विमुखतां **यातं तदा** न कोऽप्यस्ति सहायवान्।

**सतिसप्तमी (पाठ्यपुस्तकात आलेली महत्त्वाची वाक्ये)**

१. सोमशर्मणा **पृष्टे सति** अनन्तभट्टः व्याधयः कीदृशं पीडयन्ति एतत् स्पष्टीकुर्वन्नासीत्।
सोमशर्मणा **यदा पृष्टम् आसीत् तदा** अनन्तभट्टः व्याधयः कीदृशं पीडयन्ति एतत् स्पष्टीकुर्वन्नासीत्।

२. अध्ययनकाले **विद्युत्प्रवाहे खण्डिते** एतादृशी चर्चा प्रारब्धा।
अध्ययनकाले **यदा विद्युत्प्रवाहः. खण्डितः तदा** एतादृशी चर्चा प्रारब्धा।

३. **नष्टे कारणे** कुतः कार्योत्पत्तिः?
**यदि कारणं नष्टं तर्हि** कुतः कार्योत्पत्तिः?

४. **समाप्तेऽध्ययने** रॉथफिल्डमहोदयेन टागोरमहोदयेन सार्धं परिचयः कारितः।
**यदा अध्ययनं समाप्तं तदा** रॉथफिल्डमहोदयेन टागोरमहोदयेन सार्धं परिचयः कारितः।

५. **दृष्टिमात्रे तस्मिन् चित्रे** तस्य मनः प्रहृष्टमेव।
**यदा तद् चित्रं दृष्टिमात्रं तदा** तस्य मनः प्रहृष्टमेव।

६. **समुपागतवति मधुकरे** दैवादवहेलां मा गाः।
दैवात् **यदि मधुकरः समुपागतवान् स्यात् / समुपागच्छेत् तर्हि** अवहेलां मा गाः।

७. रत्नेषु लुप्तेषु बहुष्वमर्त्यैः रत्नाकरः अद्यापि एव सिन्धुः।
**यद्यपि बहूनि रत्नानि अमर्त्यैः `लुप्तानि तथापि** रत्नाकरः अद्यापि एव सिन्धुः।

## क. प्रयोजक:।

i. जेव्हा वाक्यातील कर्ता दुसऱ्या कोणाकडूनतरी क्रिया करवून घेतो, तेव्हा वाक्याचे नियमित क्रियापदाच्या जाती प्रयोजक क्रियापद वापरतात.

ii. जो कर्ता दुसऱ्याकडून क्रिया करवून घेतो, त्यास 'प्रयोजक कर्ता' आणि ती क्रिया प्रत्यक्षपणे करतो त्यास 'प्रयोज्य कर्ता' असे म्हणतात.

iii. प्रयोजक क्रियापदाचे रूप दशम गणाच्या धातूच्या क्रियापदासारखे असते.

iv. प्रयोजक क्रियापद हे प्रयोजक कर्त्याच्या पुरुष व वचनाप्रमाणे चालते.

v. वाक्यातील प्रयोज्य कर्ता म्हणजेच जो प्रत्यक्ष क्रिया करतो त्या कर्त्याची तृतीया विभक्ती योजतात.

vi. हे काही धांतूबाबत बदलते. नियमित क्रियापदातील धातूंचे अर्थ जेव्हा खालीलप्रमाणे असतात तेव्हा प्रयोज्य कर्त्याची द्वितीया विभक्ती होते.

अ. गत्यर्थक धातू उदा. गम्, या, प्र + विश्

ब. ज्ञानार्थक धातू उदा. बुध्, पठ्, श्रु

क. अकर्मक धातू उदा. चल्, स्था, नश्

ड. खाणे, पिणे या अर्थांचे धातू उदा. पा (पिब्), भुज्

अपवाद - खाद् (१ प.प) - असताना तृतीया विभक्ती योजतात कारण तेथे खाण्यास उद्युक्त केला जाणारा कर्ता अपेक्षित असतो.

vii. कृ आणि हृ धातूंबाबत प्रयोज्य कर्ता द्वितीया किंवा तृतीया दोन्हीही विभक्तींत योजता येतो.

**खालील वाक्य अभ्यासा.**

१. बालक: चलति । (प्रयोजकरचनां कुरुत।)

**उत्तर: माता बालकं चालयति ।**

**स्पष्टीकरण** → मूळ क्रियापदाचा अर्थ तपासा.

→ त्याप्रमाणे मूळ कर्त्याची द्वितीया / तृतीया योजा.

→ योग्य प्रयोजक कर्ता योजा.

→ मूळ क्रियापदाचे प्रयोजक क्रियापद तयार करा आणि ते प्रयोजक कर्त्याप्रमाणे योजा. त्याचा काळ/अर्थ मूळ क्रियापदाप्रमाणे योजा.

| | | |
|---|---|---|
| | मूळ कर्ता | नियमित क्रियापद (अकर्मक धातू) |
| | बालक: | चलति । |
| | ↓ | |
| माता | बालकं | चालयति । |
| प्रयोजक कर्ता | प्रयोज्य कर्ता | प्रयोजक क्रियापद |
| (प्रथमा) | (द्वितीया) | (वर्तमानकाळ) |

## स्वाध्यायः

***प्रयोजकरचनां कुरुत।**

१. राजा काव्यं शृणोति। (कविः)

**उत्तरः** कविः **राजानं** काव्यं **श्रावयति / श्रावयते**।

२. दशाननः स्वर्गं गच्छति। (श्रीरामचन्द्रः)

**उत्तरः** श्रीरामचन्द्रः **दशाननं स्वर्गं गमयति / गमयते**।

३. मनुष्यः नन्दति। (सुवार्ता)

**उत्तरः** सुवार्ता **मनुष्यं नन्दयति / नन्दयते।**

४. पादपः वर्धते। (मुनिः)

**उत्तरः** मुनिः **पादपं वर्धयति / वर्धयते।**

५. कृष्णः वेदान् वेत्ति। (सान्दीपनिः)

**उत्तरः** सान्दीपनिः **कृष्णं** वेदान् **वेदयति-वेदयते।**

६. दुःखकारणं नश्यति। (सद्गुरुः)

**उत्तरः** सद्गुरुः **दुःखकारणं नाशयति / नाशयते।**

७. मेघः सन्देशम् अनयत्। (यक्षः)

**उत्तरः** यक्षः **मेघेन** सन्देशम् **अनाययत् / अनाययत।**

**टीप** – या वाक्यात क्रियापद भूतकाळात योजले आहे.

∴ **प्रयोजक क्रियापदही भूतकाळात होईल.**

८. छात्रः अर्थं बोधति। (गुरुः)

**उत्तरः** गुरुः **छात्रं** अर्थं **बोधयति / बोधयते।**

९. वृक्षात् फलानि पतन्ति। (बालः)

**उत्तरः** बालःवृक्षात् **फलानि पातयति / पातयते।**

***प्रयोजकं निष्कासयत।**

१. लेरसिया रात्रिमयापयत्।

**उत्तरः रात्रिः अयात्।**

२. राष्ट्रध्वजः मां कीर्तिकथाः स्मारयते।

**उत्तरः अहं कीर्तिकथाः स्मरामि।**

३. अस्माभिः तेषामावासाः नाशिताः।

**उत्तरः तेषामावासाः नष्टाः।**